# मुंबई विद्यापीठ, मुंबई

## निविदा

मुंबई विद्यापीठातर्फे ''मराठी भाषा गौरव दिना'' निमित्त दिनांक २७/०२/२०१९ रोजी सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम सादर करण्यासाठी इच्छुक संस्था/मंडळ यांच्याकडून कार्यक्रम करण्याबाबत जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी सदर कार्यक्रमाच्या निविदा/प्रस्ताव दिनांक २२/०२/२०१९ रोजी सायं. ०३.०० वाजे पर्यंत कार्यालयात पोहचेल अशा रितीने पाठवावा. निविदेच्या लखोटयावर स्पष्टपणे ''मराठी भाषा गौरव दिना'' साठी निविदा भरलेली आहे. असे नमूद करावे. सदर निविदा अर्ज विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mu.ac.in या लिंकवर उपलब्ध आहेत.

निविदा/प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहेत.

स्वाक्षरीत
डॉ. अजय देशमुख
कुलसचिव

दि. १३/०२/२०१९

मराठी भाषा गौरव कार्यक्रम
निविदा शर्ती व अटी

विद्यापीठामार्फत श्री. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दिनांक २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे त्या अनुषंगाने मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम घेणेकरिता जाहीर पूर्व निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. | मराठी भाषा गौरव दिन आणि मराठी भाषा व संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीकोनातून कार्यक्रमामध्ये अभंग, भारूड, लावणी, पोवाडा, बोली भाषा, नाटक, इ. चा अंतर्भाव असणे आवश्यक आहे. |
| २. | निविदेच्या अनुषंगाने मंजूर होणाऱ्या रक्कमे व्यतीरीक्त इतर कोणतीही रक्कम विद्यापीठामार्फत देय असणार नाही. |
| ३. | सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने एकत्रितपणे सर्वसमावेशक खर्च प्रस्तावात नमूद करावा. (वाहन, निवास, भोजन, इ. खर्च) |
| ४. | सदर कार्यक्रमामध्ये लिंग, धर्म, जाती, भाषा इ. विषयी वादग्रस्त टीपणी करता येणार नाही. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| ५. | कार्यक्रमामध्ये ठरलेप्रमाणे कलाकार, वादवृंद व इतर अनुषंगीक बाबी असणे आवश्यक आहे. त्यामध्ये बदल केल्यास त्यानुसार रक्कम कपात करण्यात येईल. |
| ६. | कार्यक्रमा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास विद्यापीठ प्रशासन जबाबदार असणार नाही. |
| ७. | निविदेमध्ये दिल्याप्रमाणे संहिता असणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याप्रमाणे रक्कम कपात करण्यात येईल. |
| ८. | कार्यक्रमामध्ये कोणत्याही वस्तु व जाहीरातीचे प्रदर्शन करू नये. |
| ९. | सदर कार्यक्रमासाठी ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांनी रू. १००/— मुद्रांकावर करारपत्र करून द्यावे लागेल. |
| १०. | सदर कार्यक्रम मोफत असल्याने दिग्दर्शक अथवा संस्थेमार्फत कार्यक्रमासाठी तिकीट विक्री करता येणार नाही. |
| ११. | सदर कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य व अन्य आवश्यक मनुष्यबळ स्वत: आणणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून कोणतेही साहित्य अथवा मनुष्यबळ पुरविले जाणार नाही. |

निविदाधारकांचे नाव, सही व शिक्का

मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम
जाहीर पुर्व निविदा अर्ज

विद्यापीठामार्फत श्री. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दिनांक २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी **मुन्शी भवन, भवन्स महाविद्यालय, गिरगाव चौपाटी येथे साजरा करण्यात येत आहे**. त्या अनुषंगाने मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याकरिता निविदा भरणाऱ्या अर्जदाराने खालील बाबींचा उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नाव | ________________<br>________________<br>________________ |
| २. | पत्रव्यवहाराचा पत्ता | ________________<br>________________<br>________________<br>________________ |
| ३. | कायमचा पत्ता | ________________<br>________________<br>________________<br>________________ |
| ४. | अर्जदाराचा दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक | ________________ |
| ५. | अर्जदाराचा सांस्कृतिक कार्यक्रमाबाबतचा अनुभव | ________________<br>________________<br>________________<br>________________ |

अर्जासोबतची नियमावली मी वाचली असून मला ती मान्य आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यास मी / आम्ही तयार आहोत. तसेच नियमावलीतील नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही याची मी/आम्ही हमी देतो. तरी माझी /आमची निविदा स्वीकृत व्हावी, ही विनंती

आपला विश्वासू,

निविदाधारकाची सही व पूर्ण नाव

<u>दराची निविदा</u>

विद्यापीठामार्फत श्री. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी **<u>मुन्शी भवन, भवन्स महाविद्यालय, गिरगाव चौपाटी येथे साजरा करण्यात येत आहे.</u>** त्या अनुषंगाने मराठी भाषेचा गौरव वाढविणारा सांस्कृतिक कार्यक्रम घेणेबाबतचा दर खालील तक्त्यामध्ये नमूद करावा.

| अनु. क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १. | | |

निविदाधारकांचे नाव, सही व शिक्का